राज्यसेवा मुख्य परीक्षा - 2014

परीक्षा दि. ३०/८/2014

# SUBJECT : ENGLISH

**Standard : H.S.C.** **Maximum Marks : 100**

**Nature of paper : Conventional type** **Time allowed : 3 Hours**

**Note :**
(i) **All** questions are **compulsory.**
(ii) Figure to the RIGHT indicates marks of the respective question.
(iii) Credit will be given to correct spelling, punctuation, good handwriting and neatness.
(iv) Irrelevant and rambling answers will be penalised SUITABLY.
(v) Candidates should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.
(vi) Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later subquestion shall be overlooked.

**1.** Write an essay in about **1000** words on the following topic : **50**
Hailstorm : A Natural Calamity on Maharashtra State.

**2.** Translate the following Marathi passage into English : **25**

जलिकट्ट, शंकरपट या नावांनी होणाऱ्या वृषभशर्यती जनरंजनापेक्षा पैशाचाच खेळ ठरत असताना त्यांवर बंदी घातली गेली, हे बरे झाले. प्राणिहत्या ते अश्वशर्यती असे सर्वत्र क्रौर्य असताना आमच्यावरच बंदी का, असल्या युक्तिवादांच्या ढाली मोडून ही सकारात्मक सुरुवात झाली आहे..

बैलांना बोलता येत असते, तर त्यांनी नक्कीच सर्वोच्च न्यायालय जिंदाबाद वगैरे घोषणा देऊन आपला आनंद साजरा केला असता. बैलांमध्येही तशी वर्गव्यवस्था असते. काही ओझ्याचे असतात, काही गाड्याचे. तसे वर्षभर हे गाड्याचे बैल रिकामेच असतात. तशात त्यांना गावातील पुढारी, श्रीमंत शेतकरी यांचा सहवास जास्त मिळतो. त्यामुळे कदाचित त्यांनी, येथून पुढे दर बुधवार वृषभवार म्हणून साजरा करावा, अशी जोरदार मागणी करून काही काळ धुरळा उडवून दिला असता. कारण याच दिवशी सर्वोच्च न्यायालयाने बैलगाड्या शर्यतींवरील बंदीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. कदाचित या बैलांच्या सुरात सुर मिसळून, पोळ्याच्या दिवशी न्यायदेवतेलाही पुरणपोळीचा नैवेद्य द्यावा, अशी जोडमागणीही एखाद्या गोमातेने केली असती. पण हे बिचारे मुके प्राणी. हंबरण्यापलीकडे ते काय बोलणार ? तसे स्वरयंत्र सगळ्यांनाच असते. पण म्हणून सगळेच खुलेपणाने बोलू शकत

P.T.O.

StudentBounty.com
www.StudentBounty.com

StudentBounty.com



नाहीत. प्रसंगी माणसांचेही वृषभ होतात, तेथे बैलांचे काय ? तशात आता बैलगाड्या शर्यतीवरील बंदीमुळे चिडलेल्या धनदांडग्या शेतकऱ्यांचा आणि त्यांच्या पाठीराख्या पुढाऱ्यांचा आवाज हळूहळू वाढतच जाणार आहे. शिवसेनेचे खासदार रा.रा. शिवाजीराव आढळराव यांच्या दृष्टीने तर हा निर्णयच मोठा अन्यायकारक आणि सर्वसामान्य कास्तकारांच्या भावना दुखावणारा. त्यामुळे ते त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात फेरविचार याचिका दाखल करणार आहेत. तरी बरे, पवित्र गोमातेच्या पुत्रांच्या शर्यतीवर बंदी घालण्याचा हा निर्णय धर्मविरोधी असल्याचे अजून तरी त्यांनी म्हटले नाही. या शर्यती प्रामुख्याने यात्रा-जत्रांमध्येच होतात. त्यामुळे तसे म्हणणेही कुणास जड जाणार नाही. इकडे शेतकऱ्यांचे अनेक महत्वाचे प्रश्न आहेत. विदर्भ-मराठवाड्यात गारपीट, अवकाळी पाऊस अशा संकटांमुळे असंख्य शेतकऱ्यांच्या आयुष्याचा शंकरपट उधळून गेला आहे. पण रा.रा. आढळराव आदी पुढाऱ्यांच्या भावनाशील काळजाला काळजी आहे, ती बैलगाडा मालकांच्या डोळ्यांतील अश्रूंची. बैलगाडा शर्यत हा मुळात लोकखेळ. त्यामुळे त्याचे कूळ आणि मूळ शोधता सापडणार नाही. इसवी सनपूर्व बावीसशे ते दोन हजार या कालखंडातला एक काश्याचा रथ अहमदनगर जिल्ह्यातल्या दायमाबाद येथे सापडला आहे. त्या लहान मुलांच्या खेळण्यातल्या रथाला बैलांची जोडी जोडलेली आहे. म्हणजे किमान तेव्हांपासून बैलगाडी वा गाडा हा कृषिसंस्कृतीचा एक भाग होता. त्यातूण कधी तरी मनोरंजनार्थ बैलगाड्यांच्या शर्यती सुरू झाल्या असतील. हे सगळ्याच समाजात घडलेले आहे. कुठे घोड्यांच्या कुठे उंटांच्या तर कुठे कुत्र्यांच्या शर्यती. आजच्या आधुनिक समाजात तर घरोघरी उंदरांच्या शर्यतीही सुरू असतात. शर्यती आणि स्पर्धा यात तसे काही गैर नाही. अयोग्य आहे ते त्यातील क्रौर्य. गावोगावी वसंत सरता सरता यात्रा-जत्रांचा हंगाम सुरू होतो. शेतीच्या कामातून शेतकरी जरा निवांत झालेला असतो.

वावरांनाही सूर्य पिऊन घ्यायचा असतो. अशा काळात गावोगावी देवाच्या, पिराच्या यात्रा-जत्रा भरू लागतात. तेथे तमाशे, भारुडे, कीर्तनाचे फड रंगू लागतात. कुठे कुठे शंकरपट भरतात. ही सगळी जनरंजनाची लोकसाधने. इसवी सनाच्या एकविसाव्या शतकातही मनोरंजनासाठी हीच साधने पुरत असतील, तर ते मन किती पुढारले हा सवाल आहेच. पण वास्तव तेच आहे. ते केवल रंजनाच्या, हौसेच्या पातळीवर असते, तर त्यास आक्षेप घेण्याचेही कारण नव्हते. परंतु बैलगाडी शर्यत म्हणा, शंकरपट म्हणा की तामिळनाडूतल्या जलिकट्ट या नावाने प्रसिद्ध असलेल्या बैलांच्या झुंजी आणि शर्यती म्हणा, त्यांचे केव्हाच बाजारीकरण झाले आहे. लाखोंची पारितोषिके, त्यांचे प्रायोजन, जमा करण्यात येणारी वर्गणी, शर्यतीच्या आयोजनामागील राजकारणाचा कधी छुपा, कधी दृश्य असणारा पदर यातून शर्यतींचे बाळबोध स्वरूप कधीच हरवले आहे आणि उरला आहे तो केवळ अर्थ आणि राजकारणाचा खेळ. गाड्यांच्या शर्यतींमध्ये जे बैल पळविले जातात, ते घेणे, त्यांना पोसणे हे सामान्य शेतकऱ्याचे काम नाही. सामान्य शेतकरी त्यात पडतही नाही. मुळात शेतीच्या कामासाठी बैल पाळणे हीसुद्धा आज अनेकांच्या आवाक्यातली गोष्ट राहिलेली नाही. त्याऐवजी त्यांना भाड्याने ट्रॅक्टर आणणे परवडते. तेव्हा ती बागायतदार, 'गुंठामंत्री', ग्रामपुढारी यांचीच क्रीडा. त्यात बळी जातात ती मात्र मुकी जनावरे. चाबूक आणि आसुडाचे फटके हे तर बैलांच्या पाठ्यावरच पुजलेले. पण या शर्यतींमध्ये त्यांच्या पुठ्ठ्यांना अणुकुचीदार पराण्या टोचणे, खिळे लावलेल्या काठ्यांनी त्यांना बदडणे असे जे क्रूर प्रकार सर्रास केले जातात, ते बघणे हीसुद्धा एक शिक्षा म्हणावी. काही गावांमध्ये बैलगाड्यांच्या पुढ्यात घोडे पळविले जातात. म्हणजे त्या वेगाने बैलांनी पळावे. मुळात बैल हा काही वेगाने पळणारा प्राणी नाही. त्याला शर्यतीत धावायला लावणे ही त्याच्या प्रकृतीविरोधातीलच गोष्ट. वर पुन्हा शर्यत संपल्यानंतर त्याला थांबविण्यासाठी करकचून कासरा ओढला जातो. हा कासरा बैलाच्या नाकातील वेसणीला बांधलेला असतो. त्यात त्याला किती वेदना होत असतील, याची कुणाला पर्वाच नाही. वर्षभर ज्यांना पोटच्या पोराहून अधिक जपायचे, बदाम-खारकांचा खुराक लावायचा, त्यांना शर्यतीच्या दिवशी दारू पाजून पळवायचे, हा गाढवपणा म्हटले तर गाढवांच्या भावना दुखावतील!

www.StudentBounty.com

StudentBounty.com



3. Make a precis of the following passage in your own words in about 1/3rd of its original length and suggest a suitable title :

(N.B. : Appropriate marks will be deducted if your precis is longer or shorter than the prescribed length.)

The sole aim of journalism should be service. The newspaper press is a great power, but just as an unchained torrent of water submerges whole country side and devastates crops, even so an uncontrolled press serves but to destroy. If the control is from without, it proves more poisonous than want of control. It can be profitable only when exercised from within. If this line of reasoning is correct, how many of the journals in the world would stand the test ? But who would stop those that are useless ? And who should be the judge ? The useful and the useless must, like good and evil, go on together, and man must make his choice.

The superficiality, the one-sidedness, the inaccuracy and often even dishonesty that have crept into modern journalism, continuously mislead honest men who want to see nothing but justice done.

I have before me extracts from journals containing some gruesome things. There is communal incitement, gross misrepresentation and incitement to political violence bordering on murder. It is of course easy enough for the government to launch out prosecutions or to pass repressive ordinances. These fail to serve the purpose intended except very temporarily, and in no case do they convert the writers, who often take to secret propaganda, when the open forum of the press is denied to them.

I hold that it is wrong to conduct newspapers by the aid of immoral advertisements. I do believe that if advertisements should be taken at all there should be a rigid censorship instituted by newspaper proprietors and editors themselves and that only healthy advertisement should be taken. The evil of immoral advertisements is overtaking even what are known as the most respectable newspapers and magazines. That evil has to be combated by refining the conscience of the newspapers proprietors and editors. That refinement can come not through the influence of an amateur editor like myself but it will come when their own conscience is roused to recognition of the growing evil or when it is superimposed upon them by a Government representing the people and caring for the people's morals.

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**4.** Rewrite as directed :

(a) Men hunt animals. (Use article where necessary)

(b) He was too intelligent to do that (Remove 'too')

(c) What has it to do with one ? (Make it assertive)

(d) The best antidote is action. (Change the degree to positive)

(e) Very few towns in India are as rich as Mumbai.

(Change the sentence into Comparative Degree)

(f) Better behaviour from a college student is expected. (Make active sentence)

(g) Only a millionaire can afford such extravagance. (Do negative sentence)

(h) I do not remember to have met you before. (Use correct infinitive)

(i) Correct the following sentence :

All of us Ravi, Neeta and me are coming to the party.

(j) Change the following complex sentence into a simple sentence :

It is terrible that people should die of starvation.

- o 0 o -

www.StudentBounty.com